ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २१ जानेवारी, १९५३ अंक ३

## विविध माहिती

**स्वयंसेवकांना सरकारी मदत**— उत्तर प्रदेशांतील गढवाल भागांतील २६ गांवसभांनीं मिळून स्वयंसेवकांच्या मदतीनें २४ मैल लांबीचा मोटारी जाण्यासारखा रस्ता तयार केला. ह्या कामाला मदत म्हणून राज्य सरकारनें २५,००० रुपये दिले. उत्तर प्रदेशांत अशा संयुक्त प्रयत्नांनीं बरेच रस्ते बांधण्यांत येत आहेत.

**ब्रिटनचें सैनिक बल**—गेल्या वर्षाच्या जून अखेर ब्रिटनच्या सैनिकांची संख्या ८,७२,१०० होती. त्यांपैकी १,४६,३०० नाविक दलांत होते, ४,५३,१०० भूदलांत होते आणि २,७२, ७०० हवाई दलांत होते. शिलकी लष्कराची संख्या ३,४७,००० होती. संरक्षण खात्यांत २,६८,००० मुलकी कामगार होते.

**जपानसाठीं जर्मन मोटार गाड्या**— जर्मनीमध्यें व्होल्कस वॅगन वर्कस् एजन्सी नांवाचा एक फार मोठा कारखाना आहे. ह्या कारखान्याच्या चालकांनीं जपानला १०,००० जनता-मोटार गाड्या निर्यात करण्याचें ठरविलें आहे. चालकांच्या मतें जपानमध्यें एवढ्या गाड्या खपूं शकतील. भारतांत मात्र सध्या गाड्या खपण्यासारखी स्थिति नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे.

**जागतिक बँकेचें अफगाणिस्थानला कर्ज**— जागतिक बँकेनें अफगाणिस्थानच्या सरकारला १५,००,००० डॉलर्सचें कर्ज दिलें आहे. कर्जाचा विनियोग अमेरिकेंत गहूं आणि आटा खरेदी करण्यासाठीं होणार आहे. कर्जावर २॥ टक्के व्याज घेण्यांत येणार असून तें ३५ वर्षांत परत करावयाचें आहे. कर्जाचा पहिला हप्ता ६ वर्षांनीं परत द्यावयाचा आहे.

**सेसिल डीमिल भारतांत येणार ?**—सुप्रसिद्ध दिग्दर्शक सेसिल डीमिल 'टेन कमांडमेंटस्' ह्या बोलपटाचें चित्रीकरण करण्यासाठीं इजिप्तला जात आहेत. त्यानंतर ते भारतांत येऊन चित्रपट काढण्याची शक्यता अजमावून पहाणार आहेत असें समजतें. भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावर एखादा चित्रपट काढण्याचा त्यांचा विचार आहे.

**हेलिकॉप्टरनें पोस्टाचा बटवडा**—हेलिकॉप्टरच्या साह्यानें टपाल पाठविण्याची व्यवस्था युरोपमध्यें पहिल्यानें बेल्जममध्यें दोन वर्षांपूर्वीं करण्यांत आली. तेव्हांपासून आतांपर्यंत २,१०,००,००० पत्रें हेलिकॉप्टरनें पाठविण्यांत आलीं. बेल्जिअन एअर लाइन्स कंपनी ह्या कामासाठीं ३ हेलिकॉप्टर्स वापरते. विमानांनीं आतांपर्यंत १०७ टन वजनाच्या पत्रांची ने-आण केली आहे.

**चीनमधील आकाशवाणी**—कम्युनिस्ट चीनमध्यें ध्वनिक्षेपण करणारीं ७७ केंद्रें आहेत असें समजतें. त्यांपैकीं २६ केंद्रें १९४९ सालीं चीनमध्यें कम्युनिस्ट राजवट आल्यावर स्थापन करण्यांत आलीं. बाकीचीं पूर्वींपासूनच चालू होतीं.

**जपानमधील टेलिव्हिजन**—जपानमधील प्रमुख टेलिव्हिजनचें केंद्र टोकिओला आहे. ह्या केंद्राशीं संलग्न असणारीं व २०० मैल दूर असणारीं आणखी ७ केंद्रें नुकतींच चालू करण्यांत आलीं. सध्या हीं केंद्रें प्रयोगात्मक स्वरूपांत आहेत. जपानमध्यें टेलिव्हिजनची संघटना करणारी व्यापारी कंपनी आहे. तिला सरकारकडून प्रयोगासाठी परवाना मिळालेला आहे.

**रोज १०,००० कपांचा नाश**—ब्रिटिश रेल्वेजवरील फराळगृहांमधून रोज १०,००० कप व बशा फुटतात असा अंदाज करण्यांत आला आहे. प्रत्येक कपबशीचा रोज सरासरी २२ वेळा तरी वापर होतो.

**इटलीसाठी टेलिव्हिजनचें साहित्य**—इटलींत टेलिव्हिजनची केंद्रें स्थापन करण्यासाठीं ब्रिटनकडून ३,००,००० पौंड किंमतीचें यंत्रसाहित्य मागविण्यांत आलें आहे. सध्या रोम व मिलन ह्या दोन शहरांत प्रक्षेपण—केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. त्याशिवाय एक छोटें केंद्र पिसा येथें उघडण्यांत येणार आहे.

**हैद्राबादला राजघाट होणार**—हैद्राबादपासून पांच मैलांवर इसा व मुसा नद्यांचा संगम आहे, त्या ठिकाणीं राजघाट बांधण्याची एक योजना हैद्राबाद सरकारनें मंजूर केली आहे. ह्या ठिकाणीं महात्मा गांधींच्या अस्थि विसर्जित करण्यांत आल्या आहेत. कामाला प्रारंभ झाला असून खर्चाची रक्कम तीन सारख्या वार्षिक हप्त्यांनीं देण्यांत येणार आहे.

**आर्बिट्रेशन ट्रायब्यूनलची योजना**— " फेडरेशन ऑफ दि इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री " चे सभासद आणि परदेशांतील व्यापारी फर्म्स ह्यांचेमधील तंटे मिटविण्यासाठी फेडरेशननें एक आर्बिट्रेशन ट्रायब्यूनल तयार केलें आहे. ११० सभासदांची एक यादी तयार केली आहे. प्रत्येक तंटेवाला ह्या यादींतून एकाची निवड करील आणि आर्बिट्रेटर फेडरेशन नेमील.

**युनायटेड कमर्शिअल बँकेचा नफा**— युनायटेड कमर्शिअल बँक लि. ला १९५२ मध्यें २८·५ लक्ष रुपये नफा झाला. १९५१ मध्यें ३५ लक्ष रुपये नफा झाला होता. डिव्हिडंड ( प्रत्येक शेअरवर २ रु. ) कायम राहील.

# "अर्थ"स आलेले संदेश

[ "अर्थ" च्या १८ व्या वाढदिवसानिमित्त संपादकाकडे अनेक स्नेह्यांचे व हितचिंतकांचे संदेश आले आहेत. त्यांतील शुभेच्छांबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. अनुक्रमशः कांहीं संदेश येथें देत आहोंत. ]

""अर्थ" साप्ताहिक आपलीं १८ वर्षे पूर्ण करून १९ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. या प्रसंगीं मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करून आपल्या उपयुक्त कार्यांत यश चिंतितों.

"वडिलांनीं सुरू केलेलें कार्य मुलानें बेमालूम सांधाजोड साधून पुढें चालवावें असें क्वचितच घडतें. तसलें श्रेय आपण मिळविलें आहे. कै. वा. प्रोफेसर काळ्यांनीं आर्थिक विषयांच्या उहापोहाला वाहिलेलें साप्ताहिक कांहीं मर्यादेपर्यंत नुकसान सोसण्याची तयारी ठेवून केवळ वैयक्तिक जबाबदारीवर काढलें आणि यशस्वी व सुप्रतिष्ठित करून दाखविलें. त्यांचे मृत्यूनंतर न डगमगतां आपण तें कार्य तितक्यांच तोलानें गेलीं ७ वर्षे चालवीत आहां हें आपणांला निःसंशय भूषणावह आहे. आर्थिक विषयांचा अधिकृत रीतीनें व विस्तारानें परामर्श घेणारें मराठी भाषेत आपलें पत्र ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहे. हाच मान त्याला सतत मिळत राहो असें मी इच्छितों.

"लिमिटेड कंपन्यांच्या भागीदारांना आणि ठेवीदारांना कंपन्यांच्या व्यवहारांत जाणतेपणानें लक्ष घालतां येण्यास साहाय्य होईल अशी माहिती वेळोवेळीं पुरवून उद्योगधंद्यांत पैसे गुंतवूं इच्छिणाऱ्या या वर्गाला आपण योग्य मार्गदर्शन केलें आहे."

"शीतल" पुणें ४. — प. म. लिमये.

"आपल्या सामाजिक जीवनांत राजकीय प्रश्नांइतकेंच आर्थिक प्रश्नांना महत्त्व असूनहि बहुसंख्य वाचकवर्ग त्याबाबत गाढ अज्ञानांत आहे. तथापि, मराठी वाचकांना आर्थिक प्रश्नांची सांगोपांग माहिती देण्याचें काम 'अर्थ' साप्ताहिकानें गेलीं अठरा वर्षे अत्यंत निष्ठेनें चालविलें आहे. अपुरा आश्रय ही या कार्यांत सदैव येणारी अडचण कायम असूनहि "अर्थ" च्या या थोर समाजसेवेंत कधीं खंड पडला नाहीं अगर तो आपल्या ध्येयापासून कधीं ढळला नाहीं याबद्दल 'अर्थ'च्या संपादकांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें पाहिजे. 'अर्थ'च्या पुढील जीवनक्रम अधिकाधिक भरभराटीचा होवो असें मनःपूर्वक इच्छितो."

"किर्लोस्कर" किर्लोस्करवाडी. — मु. शं. किर्लोस्कर.

"सध्याच्या तंग आर्थिक परिस्थितीची झळ सर्व वर्गांतील व व्यवसायांतील लोकांना लागलेली असतांना त्याचा वर्तमानपत्र व्यवसायावर परिणाम होणें अपरिहार्य आहे व पत्र चालविणें आजच्या परिस्थितींत फारच दुर्घट झालेलें आहे. अशा प्रतिकूल अवस्थेंतसुद्धां आपल्या संपादकत्वाखालीं आपण 'अर्थाचें' काम नेटानें व कार्यक्षमतेनें चालविलेलें आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. यापुढेंही आपणांकडून त्याच जोमानें व उत्साहानें 'अर्थाच्या' द्वारें महाराष्ट्राची सेवा घडो."

वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. पुणें. — कृ. म. खांडेकर

"सन १९३५ सालीं औद्योगिक, आर्थिक व सहकारी विषयांस वाहून घेतलेलें मराठी साप्ताहिक सुरू करण्याचा निश्चय थोर व नामवंत अर्थशास्त्रज्ञ कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं करून तें आमरण आदर्श करण्याचा प्रयत्न केला. या कामीं आपण त्यांना प्रसिद्धि-पराङ्मुख राहून बहुमोल सहाय्य केलें. कै. प्रो. काळे यांच्या मृत्यूनंतर आपण सर्व जबाबदारी यशस्वीपणानें व स्वार्थत्यागपूर्वक करून वृत्तपत्र संस्थेमध्यें बहुमानाचें स्थान मिळवून "अर्थ" साप्ताहिक आदर्श करण्याचा प्रयत्न केला. वृत्तपत्र व्यवसायाच्या द्वारें महाराष्ट्रांतील बँकिंग, सहकारी चळवळ यांना योग्य असें वेळोवेळ मार्गदर्शन केलें. आपल्या हातून "अर्थ" साप्ताहिकाच्या द्वारें अशीच कामगिरी होईल, असा विश्वास आहे. महाराष्ट्रीय जनतेनें मात्र त्याचा भरपूर उपयोग करून घेतला पाहिजे, इतकेंच.

पुणें २. — य. दृ. खोले

"'अर्थ' वर्तमानपत्राचें १९ व्या वर्षांत पदार्पण करण्याचें सर्व श्रेय आपणांस आहे. सध्याच्या समाजाची आवड आणि ओढा याची प्रचीति प्रत्येक क्षणीं आपणांस येत असतांनाही 'ध्येयवाद' म्हणूनच आंखून घेतलेल्या धोरणाबाहेर न लिहितां हें वर्तमानपत्र आपण सतत १८ वर्षे चालू ठेवलेंत याबद्दल आपणांस शतशः धन्यवाद आणि असेंच मार्गदर्शन ध्येयवादानें आपण करावें, हींच अपेक्षा."

जनता सहकारी बँक लि., पुणें. — द. शं. जमदग्नि

"'अर्थ'च्या १८ व्या वाढदिवशीं त्याला दीर्घायुरारोग्य चिंतणें मी माझें कर्तव्य समजतों. मराठी नियतकालिकांचे बालमृत्यु महाराष्ट्रांत फार घडतात. 'कांहीं दोष जमिनीचे आणि कांहीं बियाण्याचे' या न्यायानें अशा अपमृत्यूंचा दोष नियतकालिकांतील 'साहित्या'कडेहि जात असेल. आपला 'अर्थ' १८ वा मैल ओलांडून आतां १९ व्या मैलांत प्रवेश करीत आहे ही गोष्ट त्यांत येणाऱ्या साहित्याच्या उपयुक्ततेची आणि सात्विकतेची निदर्शकच आहे. एवढेंच नव्हे, तर ही गोष्ट त्याच्या जोमदारपणाचीहि निशाणी आहे. 'अर्थ' एका दृष्टीनें एका प्रथितयश दिवंगत अर्थशास्त्रज्ञाचें स्मारकच होय! नवोदित लेखकांना प्रसिद्धि देऊन त्यांच्या लेखांबद्दल वाजवी कौतुक करण्याची आपली प्रथा माझ्या माहितीप्रमाणें तरी महाराष्ट्रांत अनन्य आहे.

'अर्था' चा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो आणि तो स्थिरपद होऊन महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवहारांचा रखवालदार ठरो!

करो देव कृपा थोर।
येवो दिन हा वारंवार ! ॥"

मुंबई स्टेट को. बँक लि., कोरेगांव — खं. म. खंडागळे

# अर्थ

बुधवार, ता. २१ जानेवारी, १९५१





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## अन्नधान्याचें उत्पादन व खप

### नॅशनल सॅंपल सर्व्हेच्या अहवालानें पाडलेला प्रकाश

भारत सरकारचें स्टॅटिस्टिकल अडव्हायसर, प्रो. महालनवीस, ह्यांच्या देखरेखीखाली इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटनें केलेल्या ११८९ गांवांच्या पहाणीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. उत्पादन, खप आणि आर्थिक जीवनांतील इतर अंगोपांगें ह्यासंबंधीं आकडेवारीविषयक माहिती "रॅंडम सॅंपल" पद्धतीनें मिळविण्यासाठी "नॅशनल सॅंपल सर्व्हे" ची योजना १९५० मध्यें करण्यांत आली आणि तिचेमार्फतच चौकशी, पहाणी व रिपोर्ट हीं सर्व तयार झालीं. ६४४ गांवांच्या पहाणीचें काम गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्सकडे देण्यांत आलें आहे.

भारतांतील ग्रामीण विभागांतील अन्नधान्याच्या खपाचें प्रमाण प्रस्तुत चौकशीवरून दिसून आलें, तें अत्यंत महत्त्वाचें व विचारास चालना देणारें आहे. दर घरटीं दरसाल २६.४ मण म्हणजे २१६२ पौंड अन्नधान्य खपतें; म्हणजे दर माणशीं दररोज १८.३ औंस अन्नधान्य असें प्रमाण निघतें. उत्पादनाचें प्रमाण मात्र दर घरटीं दरसाल २० मणांपेक्षां थोडें कमीच असल्याचें आढळून आलें. उत्पादनाचा अंदाज हा वास्तविक उत्पादनापेक्षां बराच कमी असला पाहिजे आणि खपाचा अंदाज जास्त विश्वासार्ह असला पाहिजे, असेंच मानावयास हवें. ह्या गोष्टी आधारभूत धरल्या तर जुलै १९४९–जून १९५० मधील उत्पादन ६ कोटी टन झालें असलें पाहिजे. उत्पादनाचा सरकारी अंदाज (४.४ ते ४.८ कोटी टन) २० ते २५ टक्यांनीं खऱ्या उत्पादनापेक्षा कमी असला पाहिजे, असें म्हणणें प्राप्त होतें. अंदाजांत एवढा मोठा फरक दिसून आला, तरी धोरण ठरविण्याच्या दृष्टीनें निश्चित असा एकादा आकडा सांगतां येण्याजोगी अद्याप परिस्थिति नाहीं; उत्पादन आणि खप ह्यांचे सरकारी आकडे वस्तुस्थितीपेक्षा कमी पातळीचे आहेत एवढेंच आज म्हणतां येईल. अन्नपुरवठ्याच्या आकडेवारीचा अभ्यास चालू ठेवण्याचें महत्त्व मात्र स्पष्ट झालें आहे, असें अहवालांत म्हटलें आहे. सरकारी आकड्यांवरून दिसतें इतकी सर्व देशाची एकत्रित अन्न–परिस्थिति वाईट नाहीं; ६ कोटी टनांच्या अंतर्गत उत्पादनाच्या मानानें ३० लक्ष टनांची आयात फार नाहीं; ४.४ ते ४.८ कोटी टनांच्या उत्पादनामागें तेवढ्याच आयातीचें प्रमाण कितीतरी जास्त भयानक दिसतें, असें प्रो. महालनवीस ह्यांनीं सांगितलें. हें सर्व खरें असलें, तरी अन्नधान्याची खरी तूट किती आहे ह्याचा आकडा सांगतां येणें कठीण आहे. तो अदाज आकड्यावर आधारलेला असल्यापेक्षा, डोकें चालवूनच काढलेला असणार, असहि त्यांनीं स्पष्ट केलें.

भारताच्या ग्रामाण विभागांतील प्रत्येक कुटुंबांत सरासरीनें ५.२१ माणस असतात. त्यापका एक चतुर्थांशापेक्षां अधिक मिळवते, एक शष्ठमांश मिळवते परत दुसऱ्या मिळवत्यांवर अवलंबून असणारे आणि निम्म्यापेक्षा अधिक परावलंबी बिन-मिळवते असतात, असें पहाणींत आढळून आलें. १९४९–५० मधील ग्रामीण विभागांतील दर माणशीं वार्षिक खर्च २२० रुपये होता. दर माणशीं सर्वांत ज्यास्त खर्च (३१४ रु.) वायव्य भारतांत आणि सर्वांत कमी खर्च (१९८ रु.) मध्य भारतांत आढळला. पश्चिम भारतांत तो २२३ रु. होता. घरगुती खर्चांपैकीं दोन तृतीयांश खर्च अन्नावर झाला, एक चतुर्थांश कपड्यावर झाला आणि उरलेल्या एक चतुर्थांशांत बाकी सर्व खर्च भागवावा लागला. ह्यावरून आर्थिक रहाणीचा कनिष्ठपणा स्पष्ट होईल. सबंध देशाच्या सरासरीप्रमाणें, दुधाचा दर माणशीं दरमहा खप २ शेर होता. वायव्य भारतांतील मनुष्य दरमहा ५ शेर दूध प्याला, तर दक्षिण व पूर्व भारतांतील मनुष्याच्या वाट्यास दरमहा १ शेर दूध कसेंबसें आलें. प्रत्येक भारतीयानें दरसाल सरासरीनें २१ रुपयांचें कापड वापरलें. पश्चिम भारतांतील त्याची सरासरी ३१ रु. व पूर्व भारताची १५ रु. ८ आ. भरली.

भारतासारख्या प्रचंड आकारमानाच्या व वैचित्र्यपूर्ण देशांत सतत चालू राहील अशा धर्तीवर विश्वासार्ह आंकडेवारी मिळविण्याचें काम अति मोठें व गुंतागुंतीचें आहे आणि हें करण्याच्या तंत्राबाबत सतत प्रयोग करून आणि वेळोवेळीं उपलब्ध झालेल्या निष्कर्षांच्या संपूर्ण तपासणीद्वारां मूल्यमापन आणि पुनर्मूल्यमापन करूनच निश्चित निष्कर्ष काढतां येतील. योग्य प्रकारें नियोजिलेल्या नमुना पाहाणींत नमुन्यासंबंधीं मिळालेल्या माहितीवरूनच निष्कर्षांतील चुकांचें प्रमाण किती आहे हें ठरवितां येतें. हा सॅम्पलिंग पद्धतींतील मोठा शास्त्रीय फायदा आहे. त्यासाठीं आवश्यक ती आंकडेमोड सुरू करण्यांत आली असून त्यांचे निष्कर्ष उपलब्ध झाल्यावर या पाहणींत मिळालेल्या निरनिराळ्या अंदाजांच्या बिनचुकपणाचें मूल्यमापन करण्यास बरेंच साह्य होईल. आतांपर्यंत मिळालेले निष्कर्ष विचारास चालना देणारे असून मार्च, १९५१ पासून पुढें आणखी तीनदां केलेल्या चौकशीचे निष्कर्षही त्याचप्रकारें विचारास चालना देतील, हें उघड आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीसंबंधींच्या आवश्यक त्या माहितीचा नॅशनल सॅम्पल सर्व्हेकडून सतत पुरवठा होत राहील आणि त्याचा देशाच्या नियोजित आर्थिक विकासाचे दृष्टीनें फार उपयोग होईल. नॅशनल सॅंपल सर्व्हेच्या ह्यापुढील अहवालांकडे अभ्यासू लोकांचें लक्ष लागून रहाणें स्वाभाविक आहे. आकडेशास्त्रावर आणि सरकारी अंदाजांवर त्यामुळें लोकांचा विश्वास वाढेल, अशी आशा आहे.

---

**चांदीगडची प्रसिद्धि**—पंजाबची नवी राजधानी चांदीगड येथें वसविण्याचें कार्य सध्या चालू आहे. ह्या कामाची कित्येक छायाचित्रें लंडन टाइम्समध्यें नुकतींच प्रसिद्ध करण्यांत आलीं. घरांचें बांधकाम चालू असतांना घेतलेला, बाजाराचीं व इतर कित्येक चित्रें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( कंसांतील आंकडे मागील वर्षाच्या त्या त्या बाबींचे आहेत )

| | |
|---|---|
| कर्जरोख्यांच्या विक्रींत आलेला तोटा ( रु. २१,६५४-११-० ) व नोकरवर्गास बोनस देण्यासाठी केलेली तरतूद ( रु. २१,०००/- ) वजा जातां बँकेस ३१-१२-५२ अखेर संपणाऱ्या वर्षी झालेला निव्वळ नफा. | रु. २,५४,५२०—२-११ |
| | ( रु. २,३९,६५०-२-६ ) |
| अधिक गुदस्त सालचा नफा ( शिल्लक पुढें ओढलेली ) | रु. ५४,८४९-१०-११ |
| | ( रु. ५३,१९९—८—५ ) |
| एकूण | रु. ३,०९,३६९-१५-१० |
| | ( रु. २,९२,८४९-१०-११ ) |
| वजा वांटणी ( संकलित ) इन्कम-टॅक्ससाठी तरतूद | रु. १,२०,०००—०—० |
| | ( रु. १,१०,०००—०—० ) |
| रिझर्व्ह फंडांत जमा करणें | रु. ५१,०००—०—० |
| | ( रु. ४८,०००—०—० ) |
| करमाफ द. सा. द. शें. ५% डिव्हि-डंड देण्यासाठी तरतूद. | रु. ८०,०००—०—० |
| | ( रु. ८०,०००—०—० ) |
| ही रकम पुढील वर्षाच्या नफ्यांत मिळविली जाईल. | रु. ५८,३६९-१४-१० |
| | ( रु. ५४,८४९-१०-११ ) |

## रिझर्व्ह बँकेचे नवे डायरेक्टर्स
### श्री. वर्दे ह्यांची फेर-नेमणूक

भारत सरकारनें ८ ( १ ) व कलमाखाली नेमणुका केल्या आहेत, त्यापैकीं सेंट्रल व वेस्टर्न एरिआ बोर्डाच्या सभासदांचीं नांवें येथें दिलीं आहेत.

**सेंट्रल बोर्ड**

श्री. पुरुषोत्तमदास ठाकुरदास ( मुंबई ), श्री. बी. एम. बिर्ला ( कलकत्ता ), लाला श्री राम (दिल्ली) व श्री. सी. आर. श्रीनिवासन् ( मद्रास ). ( हे चौघेहि सध्यासुद्धा डायरेक्टर आहेतच; नवी नेमणूक कोणाचीहि नाहीं. )

**पश्चिम विभाग**

श्री. पुरुषोत्तमदास ठाकुरदास, श्री. एम. एम. परेख, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. मोहनलाल टंडन (प्रो. एम. एल. टॅनन) आणि श्री. के. सी. महिंद्र ( श्री. रामदेव पोदार व प्रो. द. गो. कर्वे ह्यांच्या जागीं श्री. टंडन व श्री. महिंद्र हे आले आहेत. )

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, सटाणें

नाशिक जिल्ह्यांतील सर्व सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीज व नोकरांसाठीं सटाणें येथें तारीख ७-१-१९५३ रोजीं सटाणा खरेदी-विक्री संघ लि. चे ऑफिसांत सेक्रेटरिज ट्रेनिंग क्लासचें उद्‌घाटन श्री. आर. जी. तिडके ( वकील ), चेअरमन यांचे अध्यक्षतेखाली करण्यांत आलें. त्यावेळीं श्री. डी. ए. पाटील, मॅ. डायरेक्टर, श्री. भिकुनराव पाटील, श्री. ठाकूर बँक इन्स्पेक्टर, को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. कुलकर्णी, ऑडिटर आणि सुपरवायझर्स, इतर सभ्य गृहस्थ व विद्यार्थी वगैरे मंडळी हजर होती.

## भारत-जपान सहकार्यांतील अडचणी

भारतांत जपानच्या तांत्रिक मदतीनें १० कोटी डॉलर्स भांडवलाचा एक लोखंड व पोलादाचा कारखाना काढण्याचें घाटत होतें. परंतु तत्संबंधीं चाललेल्या वाटाघाटींत कांहीं अडचणी उपस्थित झाल्याचें समजतें. ह्या कारखान्याला जागतिक बँकेकडून ५ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे. कर्ज मिळाल्यास त्यासंबंधीं जी हमी द्यावी लागेल ती एकट्या भारतानें द्यावी, जपान तींत सहभागी होऊं शकणार नाहीं, असें जपानचें म्हणणें आहे. जपानला भारताकडून बरेच बिडाचें लोखंड पाहिजे आहे आणि त्यासाठी दोन भट्ट्या भारतांत उभारण्याची जपानची तयारी आहे. पण ह्या भट्ट्यांच्या साह्यानें जें लोखंड व पोलाद तयार होईल तें जागतिक किंमतीप्रमाणें घेण्याची जपानची तयारी नाहीं. उत्पादनाचा प्रत्यक्ष खर्च आणि सामान्यपणें मिळणारा नफा ह्यावर आधारलेली किंमत देण्याची मात्र जपानची तयारी आहे. ह्या कारखान्यांत भागीदार म्हणून काम करीत असल्यानें लोखंड जपानला नेण्याबाबत खास सवलतीहि जपानला पाहिजे आहेत. भारत अर्थातच ह्या गोष्टीला कबूल नाहीं. जपान भारताला जी तांत्रिक मदत देणार आहे तिचा अंतर्भाव जपान घालणार असलेल्या भांडवलांत करण्यांत यावा अशी तिसरी जपानची अट आहे. ह्याचा व्यवहारांत अर्थ असा कीं, जपान कारखान्यांत जितकें भांडवल गुंतविण्यास तयार आहे तितकें भांडवल प्रत्यक्ष डॉलर्सच्या रूपानें देण्यास तो तयार नाहीं. अशा परिस्थितींत भारत व जपान ह्यांच्या सहकार्यानें काढण्यांत येणारा हा कारखाना निघेल कीं नाहीं ह्यासंबंधीं शंका उत्पन्न झाली आहे. पुढील महिन्यांत जपानी उद्योगपतींचें एक मंडळ संकल्पित कारखान्याच्या जागेची पहाणी करण्यासाठीं आणि संयुक्त कंपनीच्या स्थापनेची चर्चा करण्यासाठी भारतांत येणार आहे. त्यावेळीं अधिक तपशीलवार वाटाघाटी होण्याचा संभव आहे

## श्री. सोनाळकर सिंगापूरकडे रवाना

युनायटेड कमर्शिअल बँक लि. च्या महाराष्ट्रांतील शाखांचे एजंट श्री. चिं. रा. सोनाळकर ह्यांची बँकेच्या सिंगापूर शाखेचे एजंट म्हणून बदली झाली आहे. तेथें रुजू होण्यासाठी ते सौ. सुमतीबाईंचेसह सोमवारीं येथून निघाले व शुक्रवारीं ते कलकत्ता येथून विमानानें सिंगापूरला जातील. परदेशांतील शाखेंत जबाबदारीचें काम करण्याची संधी श्री. सोनाळकर ह्यांस मिळाली असून, त्यांच्या अनुभवाचा उपयोग परदेशांतील धंदा वाढविण्याकडेच बँक करील, असें दिसतें. त्यांच्या नव्या क्षेत्रांत त्यांना आम्हीं सुयश चिंतितों.

## संक्रांतीच्या लुटण्याचा सदुपयोग

श्री. शकुंतलाबाई परांजपे ह्यांनीं " पाळणा थांबवावयाचा, का लांबवावयाचा " ह्या नांवाची एक लहानशी पुस्तिका नुकतीच प्रसिद्ध केली आहे. तिची उपयुक्तता पटलेल्या पुणें येथील एका सुशिक्षित महिलेनें गेल्या संक्रांतीचे वेळीं त्या पुस्तिकेच्या प्रती लुटून कुटुंब नियोजनाच्या प्रचारास हातभार लावला आहे, असें समजतें.

## पुणें पीपल्स को. बँकेचा वाढदिवस

पुणें पीपल्स को. बँकेच्या कामकाजास प्रारंभ होऊन वसंतपंचमीस एक वर्ष पुरें झालें. ह्या वाढदिवसानिमित्त बँकेनें सोमवार ता. १९ रोजीं पानसुपारी समारंभ केला.

## बँकिंगच्या आंखणीची निश्चित योजना हवी.

लेखकः—गोविंद विठ्ठल सराफ, बी. ए., एलएल. बी.

पुणें येथें गेल्या महिन्यांत झालेल्या बँकिंग प्रदर्शनाचे कार्यक्रमांत तज्ञांचीं दोन व्याख्यानें करविण्यांत आलीं. पहिल्या दिवशीं डॉ. पाणंदीकर यांनीं स्वातंत्र्यानंतरचें हिंदी बँकिंग या विषयाचें मार्मिक विवेचन केलें. तर, दुसऱ्या दिवशीं, श्री. सावकार यांचें " भारतांतील बँकिंगची प्रगति व विकास " या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झालें. या प्रसंगीं प्रि. धनंजयराव गाडगीळ यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. श्री. सावकार यांनीं आपल्या व्याख्यानांत जगांतील प्रमुख राष्ट्रांतून बँकिंगची संस्था व कार्यवैशिष्ट्य या दृष्टीनें कशी स्वाभाविक वाढ होत गेली याचा इतिहास मनोरंजक रीतीनें सांगून हिंदी बँकिंग अद्याप कोणत्या अवस्थेंत आहे याचें दिग्दर्शन केलें. अध्यक्षांनीं समारोप करतांना एक महत्त्वाची व मुद्देसूद सूचना केली. ती अशी कीं, आपल्या देशांत बँकिंगची वाढ होत असली तरी तिच्यामागें आवश्यक ती सूत्रबद्धता अद्याप आलेली नाहीं. मोठ्या बँका, लहान बँका, स्थानिक बँका, इंडस्ट्रियल बँका, को-ऑपरेटिव्ह बँका, स्वेच्छेनुसार कार्य करीत आहेत. त्यांच्या मतें या सर्व बँका जरूरीमुळेंच अस्तित्वांत आल्या असून देशाला या सर्वांचीच गरज आहे. परंतु, कार्यवैशिष्ट्य व साधनशक्ति यानुसार त्यांचीं उपयुक्त क्षेत्रें ठरविण्याचें कार्य अद्याप निश्चित करण्यांत आलेलें नाहीं. तरी त्या दिवशींचे विद्वान् व्याख्याते व रिझर्व बँकेच्या रिसर्च खात्याचे डायरेक्टर श्री. सावकार यांनीं याबाबत आवश्यक असलेली सर्व माहिती मिळवून पुढील खेपेस हिंदी बँकिंगची आंखणी कशी असावी ( Structural Aspect of Banking ) अशा विषयावर एक व्याख्यान द्यावें अशी सूचना केली.

रिझर्व बँकेनें बँकांवर नियंत्रण करण्यासाठी जे अधिकार आपणाकडे घेतले आहेत त्यांत नवीन शाखा उघडण्यास परवानगी देण्याबाबतचा महत्त्वाचा अधिकारहि आहे. यामुळें कोणत्याहि बँकेस आपलें क्षेत्र वाटेल तसें विस्तृत करण्यास मुभा राहिलेली नाहीं. रिझर्व बँकेकडे अर्ज करून परवानगी मिळेलच अशी खात्री देतां येत नाहीं. परंतु, स्थूलमानानें असें म्हणतां येईल कीं, आपल्या देशांत प्रमुख गणल्या जाणाऱ्या बँकांनीं अर्ज केल्यास त्यांना परवानगी देतांना त्या शाखेमुळें बँकिंगची प्रगति व मजबुती करणाऱ्या इष्ट पद्धतींचा अंमल होण्याची आशा व्यक्त करण्यांत येते. मग त्या ठिकाणीं पुष्कळ दुसऱ्या जुन्या बँका व्यवहार करीत असल्यानें त्या नव्या शाखेमुळें गर्दीच झाली तरी चालेल. तसेंच, याउलट, व्यवस्थित रीतीनें व्यवहार करणाऱ्या एखाद्या मध्यम आकाराच्या बँकेस परवानगी नाकारतांना, त्या ठिकाणीं नवीन शाखा आल्यास त्यांची जास्त गर्दी होऊन ती शाखा स्वयंपूर्ण होण्यासाठी गैर-बँकिंग पद्धतींचा अवलंब होण्याचा संभव दिसतो अशी धास्ती व्यक्त करण्यांत येते, मग त्या ठिकाणीं या परवानगी मागणाऱ्या बँकेस तेथील दळणवळणामुळें गिऱ्हाइकास उपयुक्त होण्याची व व्यवहार वाढण्याची कितीहि बळकट आशा असो. मोढवी येथें शाखा उघडण्यास परवानगी नाकारतांना अशाच स्वरूपाचीं कारणें एका चांगल्या बँकेस देण्यांत आल्याचें समजतें. परंतु, सांगली शहरांत सेंट्रल बँक ऑफ इंडिया हिला शाखा उघडण्यास परवानगी देतांना मात्र पहिल्या स्वरूपाची आशा वाटत असावी असें म्हणतां येईल.

SAVE to help yourself and the NATION,




WITH THE HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

वस्तुस्थिति पाहतां सांगली सारख्या जिल्ह्याचें ठिकाण असलेल्या शहरांत सध्यांच पुढीलप्रमाणें बँका कार्य करीत आहेत. ( १ ) सांगली बँक ( २ ) पंजाब नॅशनल बँक ( ३ ) बँक ऑफ महाराष्ट्र ( ४ ) न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया ( ५ ) बँक ऑफ पुना ( ६ ) रत्नाकर बँक ( ७ ) महाराष्ट्र ॲपेक्स बँक ( ८ ) साउथ सातारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक ( ९ ) अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक ( १० ) सांगली इंडस्ट्रियल बँक.

यांपैकीं पहिल्या पांच शेड्यूल्ड असून त्यांतील पंजाब नॅशनल ही बड्या बँकांपैकी एक आहे. खुद्द सांगली बँक ही दक्षिणी संस्थानांच्या आमदानीपासूनची एक वजनदार बँक असून तिची मुख्य कचेरी तेथें आहे. सांगली शहराची लोकसंख्या एक लाखाचे आसपास असून व्यापारपेठ मोठी असली तरी कारखानदारी व्यापक स्वरूपाची नाहीं. सध्याच्या बँका तेथील पैशाची मागणी सहज भागवूं शकतात असें त्यांच्या ताळेबंदांतील शिलकी रकमांवरून म्हणतां येईल. तसेंच ठेवीवरील व कर्जावरील व्याजाचे दरहि माफक ठरणारेच आहेत. वर्षातून फक्त ६ महिनेच व्यापारी मोसमाचे असल्यानें बाकी महिने, व्यवहाराचे दृष्टीनें, स्वस्थतेचेच असतात. हें सर्व लक्षांत घेतां येथें बँकिंगची सोय जरूरीपेक्षा जास्तच वाटण्याजोगी असतां सेंट्रल बँकेच्या नवीन शाखेमुळें बँकिंगची वाढ इष्ट पद्धतीनें होऊं शकेल हा अभिप्राय गृहीतच धरावा लागतो.

सेंट्रल बँकेची एक शाखा गोकाक सारख्या तालुक्याच्या ठिकाणींहि उघडण्याचा विचार नक्की झालेचें समजतें. गोकाकची वस्ती १०-१२ हजार असून सध्यां तेथें ३ बँका काम करीत आहेत. त्यांपैकीं एक शेड्यूल्ड बँकेची शाखा आहे. तेथें आणखी एका बँकेची शाखा होती ती २ वर्षांपासून व्यवहारास विशेष वाव नसल्यामुळें बंद करावी लागली. तरीहि बड्या बँकांची शाखा तेथें उघडण्यास वाव असल्याचें संचालकांची खात्री होण्यास कदाचित एखाद्या एजंटाचा उत्साहहि कारण असूं शकेल, गोकाकहून अवघ्या २० मैलांवर बेळगांव येथें सेंट्रल बँकेच्या व इंपीरियल बँकेच्या शाखा काम करीत आहेत. तेव्हां बड्या बँकांकडील सोयीची आवश्यकता कोणास कधीं वाटली तर ती सहज मिळूं शकते. हें सर्व विचारांत घेतां कोणत्याहि कारणास्तव आणखी एका बँकेची आवश्यकता तेथें असल्याचें दिसून येत नाहीं. त्यांतच, बड्या बँकांच्या शाखा जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणीं अशा पद्धतीनें उघडण्यांत आल्यास त्या स्थानिक बँकांस पोषक होत नाहींत. कारण, असा अनुभव आहे कीं, या बड्या बँका व्यक्तिगत गिऱ्हाइकांतक्याहि सवलती स्थानिक बँकांना देऊं इच्छित नाहींत किंवा रेमिटन्स बाबत

कांहीं विशेष सोयी देऊं शकत नाहींत. तसेंच ह्या लहान व्यापाराच्या ठिकाणींहि ओपन गोडाऊन सारख्या पुढारलेल्या पद्धतीनें कर्जें देण्यांत येतात. यांत सर्वच ठिकाणीं सुरक्षितता नसल्यानें स्थानिक बँकांना अशा पद्धतीनें व्यवहार करणें इष्ट वाटत नाहीं. बड्या बँकांचें अस्तित्व हें अशा बँकांना साहाय्यक होत नसल्यानें त्यांच्या स्वाभाविक क्षेत्रांत त्यांचें आक्रमण होत असल्याची तक्रार करणें जरूर वाटते. विविध आकाराच्या बँका या एकमेकांस पोषक होऊन त्यांच्या कार्यांत एकसूत्रीपणा येणें आवश्यक असेल तर त्यांचीं कार्यक्षेत्रें निश्चितपणें ठरवून तदनुसार त्यांच्या शाखांची मांडणी करवणें हें आवश्यक आहे व या हेतूनेंच रिझर्व बँकेकडे परवानगी देण्याचा अधिकार देण्यांत आला असावा. स्थानिक बँका या मर्यादित क्षेत्रांत उपयुक्त कार्य करीत आहेत म्हणूनच त्यांची वाढ झालेली आहे. तरी, त्यांची शक्ति वाढविण्याच्या दृष्टीनें व जरूर त्या जास्त सोयी करून देण्यासाठी जर बड्या बँकांची एखादी शाखा जिल्ह्याच्या ठिकाणीं उघडण्यास परवानगी दिली तर तें स्वागतार्हच होईल. मात्र, अशा शाखेनें स्थानिक किंवा इतर बँकांना सवलतीच्या दरानें जरूर त्या सोयी कराव्या व शक्यतों व्यक्तिगत गिऱ्हाइकांशीं व्यवहार न करण्याचेंहि धोरण ठेवावें. यामुळें बड्या बँकांच्या पद्धतीचें इष्ट तें वळण लहान बँकांना लागून, अनिष्ट चढाओढ होण्याचें कारण राहाणार नाहीं. त्यांच्यावर अप्रत्यक्षपणें देखरेख राहून बँकिंगची प्रगति मजबूत रीतीनें होईल. श्रि. गाडगीळ यांची सूचना या दृष्टीनें महत्त्वाची वाटते. तरी, रिझर्व बँकेकडून तिचा योग्य तो विचार होऊन निश्चित योजना लवकर करण्यांत येईल अशी उमेद आहे.

## पंजाबमधील सायकलींचा उद्योगधंदा

पंजाबमधील सायकलीच्या धंद्यानें चांगली प्रगति केली आहे. लुधिआनासारख्या एकाच गांवांत सायकलींना लागणारे भाग तयार करणारे सुमारे २०० छोटे कारखाने आहेत. ह्या धंद्यांत ४,४०० कामगार काम करीत असून त्यांची वार्षिक प्राप्ति अंदाजे २,००,००० रुपये आहे. सर्व कारखान्यांत मिळून दरवर्षी १·५ कोटी रुपये किंमतीचा माल तयार होतो आणि त्यांना दर तीन महिन्याला ८०० टन पोलाद कच्चा माल म्हणून लागतें. कारखान्यांत सायकलीला लागणारे सर्व सुटे भाग तयार होतात. फक्त साखळी, फ्रीव्हील व स्टील बॉल्स येवढेच साहित्य तयार होत नाहीं. तथापि आयातीसंबंधींच्या अनिश्चित धोरणामुळें सध्या ह्या धंद्याची परिस्थिति चमत्कारिक झाली आहे. त्याशिवाय किंमती पडल्यामुळेंही उत्पादनावर परिणाम झाला आहे. १९५१ सालअखेर ह्या छोट्या कारखान्यांची संख्या १८० होती. त्यांत सुमारे १,४०० कामगार रोजगारी करीत होते. परंतु आयातीसंबंधींच्या अनिश्चित धोरणामुळें जवळजवळ ३० ग्रामोद्योगी कारखान्यांना आपलीं दारें बंद करावीं लागलीं व त्यामुळें ५०० कामगारांना बेकार व्हावें लागलें. गेल्या वर्षाच्या जुलै ते सप्टेंबर ह्या काळांत सर्व कारखान्यांची जितकी उत्पादनक्षमता होती तीपैकीं फक्त ४० टकेच प्रत्यक्ष उपयोगांत आणली गेली. आक्टोबरमध्यें आयातीचें नवें धोरण जाहीर झाल्यावर सर्व कारखाने पुन्हा चालू झाले आणि त्यांनीं आपली ६० टक्के उत्पादनक्षमता कारणीं लावली. पण डिसेंबरमध्यें उत्पादन पुन्हा २० टक्क्यांनीं खाली आलें. गेल्या सालीं ह्या कारखान्यांनीं ४,६०० सायकलींच्या फ्रेम्स आणि १,००,००० पंप तयार केले. त्याशिवाय इतरही कांहीं प्रकारचे सुटे भाग तयार केले. १९५२ सालच्या शेवटच्या महिन्यांत एका कारखान्यानें ५,००० तिचाक्या तयार केल्या.

## अविवाहितपणाच्या जोखमीचा विमा

प. युरोपमधील सर्वच देशांत तरुणींचीं लग्नें होण्याचें अवघड होत चाललें आहे. पण त्यांतल्या त्यांत डॅनिश तरुणींचीं लग्नें होण्याचें अधिकच दुर्घट झालें आहे आणि म्हणून कोपनहेगन येथील एका विमा-कंपनीनें अविवाहित रहाण्याच्या जोखमीचा विमा उतरण्याचा व्यवसाय आरंभिला आहे. डेन्मार्कमध्यें दर वर्षी दर हजारी लोकसंख्येंत सरासरी ९ लग्नें होतात अशी आकडेवारी काढण्यांत आली आहे. तिचा फायदा घेऊन अँटी-सेलिबसी इन्शुरन्स सोसायटी काढण्यांत आली आहे. विम्याचे दर तरुणीचें विमा उतरण्यावेळचें वय आणि विम्याची रक्कम मिळण्याच्या वेळचें वय ह्यांच्याप्रमाणें निरनिराळे असतात. हत्ते वार्षिक असतात. विमा उतरणाऱ्या व्यक्तीचें लग्न कांहीं विवक्षित वर्षांच्या आंत न झाल्यास विम्याची रक्कम एकदम देण्यांत येते अगर त्याच रकमेचें वर्षासन देण्यांत येतें.

## हॉलिवुडमधील बोलपटनिर्मितीचा वाढता खर्च

गेल्या कांहीं वर्षांत हॉलिवुडमध्यें निघणाऱ्या बोलपटांच्या खर्चांत मजुरीच्या चढत्या दरानें खूपच भर घातली आहे. एकूण होणाऱ्या खर्चांत वाढत्या वेतनामुळें १,३०,००० डॉलर्सची वाढ झाली आहे. कोलंबिआ पिक्चर्स कंपनीच्या वार्षिक अहवालांत १४,००,००० डॉलर्स वाढलेला वेतन-खर्च म्हणून दाखविण्यांत आला आहे. ह्या व इतर कारणांमुळें कंपनीच्या निवळ उत्पन्नांत बरीच घट झाली आहे. ३० जून, १९५२ रोजीं संपलेल्या वर्षांत कंपनीला ८,०२,८७२ डॉलर्स निवळ नफा झाला. त्याच्या मागील वर्षी १४,९७,८१४ डॉलर्स नफा झाला होता. एकूण उत्पन्न मात्र गेल्या ३० वर्षांत झालें नव्हतें एवढें म्हणजे ५,९०,८१,२१३ डॉलर्स झालें. कंपनीनें परकीय भाषांतील चित्रपटांच्या वितरणाचा धंदा केला होता, त्यांत तिला बराच फायदा झाला.

**रेल्वेजच्या उत्पन्नांत घट**—चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांसंबंधीं प्रसिद्ध झालेल्या आकड्यांवरून रेल्वेजच्या उत्पन्नांत लक्षांत घेण्यासारखी घट झाल्याचें दिसतें. गेल्या वर्षी ह्याच काळांत १८२ कोटी रुपये एकूण उत्पन्न झालें होतें. चालू सालीं १७२ कोटी रुपये झालें आहे. भारताच्या अंदाजपत्रकांत रेल्वे-खात्याकडून २०९ कोटी रुपयांच्या उत्पन्नाची अपेक्षा करण्यांत आलेली आहे. उतारूंकडून होणाऱ्या उत्पन्नांत ६॥ कोटी रुपयांची आणि मालवहातुकीच्या उत्पन्नांत ४ कोटी रुपयांची घट झाली आहे.

**वाशिंग्टनला इमारत बांधणार**—इंडिया सद्भाव मिशनच्या व इतर कांहीं कचेऱ्यांसाठी वाशिंग्टन येथें एक इमारत बांधण्याचें भारतीय सरकानें ठरविलें आहे. इमारतीला २,३४,००० डॉलर्स म्हणजे ११,११,५००- रुपये खर्च येईल. सध्या इमारत दोन मजलीच बांधण्यांत येणार आहे. पण अधिक मजले बांधण्यासारखा मजबूत पाया मात्र घालण्यांत येणार आहे. तयार इमारतीला फार किंमत पडत असल्यानें वरील निर्णय घेण्यांत आला आहे.

**व्हिक्टर ह्यूगोच्या पुस्तकांचें प्रदर्शन**—बर्न येथील स्विस नॅशनल लायब्ररीमध्यें व्हिक्टर ह्यूगोच्या पुस्तकांचें व छायाचित्रांचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनाचा हेतु त्याच्या जीवनाचें समग्र दर्शन घडविण्याचा आहे.

## १९५२ वर्षाबद्दल आर्थिक घडामोडींचा अंदाज

(मा. म. काळे)

१९५२ च्या फेब्रुवारी महिन्यांत हिंदमध्यें मंदीची लाट सुरू झाली व त्यामुळें कांहीं वस्तूंचे बाजारभाव एकदम उतरले, व या मंदींतून विशेषतः व्यापारी व कांहीं कारखानदार लोकांवर संकट आलें. या मंदीला कांहींसें कारण आंतरराष्ट्रीय राजकीय व आर्थिक परिस्थिति होतीच. १९५२ मध्यें अमेरिकेंतील कांहीं मुख्य वस्तूंच्या किंमती १२·७ टक्क्यांनी उतरल्या व ग्रेट ब्रिटनमधील कांहीं किंमती १२·८ टक्क्यांनी घटल्या. याच काळांत हिंदमधील सर्वसाधारण वस्तूंच्या किंमती १४ टक्क्यांनी उतरल्या. विशेषतः उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती जास्त प्रमाणांत उतरल्या. आर्थिक दृष्ट्या १९५२ मध्यें विक्रेत्यांची बाजारपेठ बंद होऊन बहुतेक प्रत्येक बाबतींत खरेदीदारांची बाजारपेठ निर्माण झाली, मालाच्या खपासाठी कारखानदार व विक्रेते यांस विशेष प्रयत्न करावे लागले, कांहीं बाबतींत उत्पादन मर्यादित करावें लागलें, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत भासणारा आवश्यक कच्च्या मालाचा तुटवडा नष्ट होऊं लागला, सोन्याची किंमत थोडीशी उतरली, जगांतील प्रमुख धंदा म्हणजे सुती कापडाचें विणकाम याची परिस्थिति उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांच्या स्पर्धेमुळें चिंतनीय बनली व तिचे पडसाद सप्टेंबर महिन्यांत ब्रायटन (ब्रिटन) परिषदेंत उमटले. परंतु याचवेळीं अन्नपरिस्थिति विशेषशी न सुधारल्यामुळें धान्याच्या किंमतींच्या मजबुतपणामुळें इतर बाबतींत कमकुवत बनलेला व्यापार सांवरला गेला व याचे परिणाम विशेषतः हिंदसारख्या देशांत दिसून आले. कांहीं असलें तरी १९५२ वर्ष हिंदमध्यें कांहीं समाधानकारक गेलें नाहीं व याच्या निदर्शक गोष्टी म्हणजे निरनिराळ्या कंपन्यांच्या डिव्हिडंड-मध्यें घट, कारखाने तात्पुरते बंद ठेवावे लागणें, वृत्तपत्रांना मिळणाऱ्या जाहिरातींच्या उत्पन्नांत घट, मालाचे सेलुस सुरू करणें, वगैरे गोष्टी होत. गिरण्यांचें व हातमागावरील कापड, साखर, चहा, डिझेल इंजिनें, साबण, प्लॅस्टिक्स इ. कारखानदारांना १९५२ ची मंदी भोंवली व ती अजूनहि भोंवत आहे. १९५१ च्या नोव्हेंबरमध्यें रिझर्व्ह बँकेनें बँक रेट वाढविला व गेल्या वर्षापासून रिझर्व्ह बँकेनें व्यापारी लोकांच्या हुंड्या विकत घ्यावयास सुरवात केली या गोष्टींचा चांगला परिणाम झाला.

१९५३ वर्ष आर्थिक दृष्ट्या कसें जाईल याचा विचार करतांना असें दिसतें कीं चालू वर्षी विशेष अशी कोणती सुधारणाहि होणार नाहीं किंवा परिस्थिति जास्तहि बिघडणार नाहीं. १९३० च्या मंदीशी तुलना करतां येईल अशी परिस्थिति अद्याप निर्माण झालेली नाहीं, हें निश्चित. कोरियन प्रकरण चिघळत पडलें आहे व यामुळें प्रत्यक्ष लष्करी खर्च जरी जास्त वाढला नाहीं तरी युद्धाच्या तयारींत राहण्याच्या दृष्टीनें तो कांहीं एका मर्यादेपर्यंत केला जाणारच. अमेरिका व रशिया यांच्या परस्पर संबंधांत कांहींच सुधारणा नाहीं. इराणमधील तेलाचा प्रश्नहि अजून सुटत नाहीं, व आफ्रिकेंत नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढण्याची शक्यता मुळींच नाहीं. स्टर्लिंग गटांतील देशांची डॉलर्सच्या दृष्टीनें स्थिती थोडीशी सुधारली असली तरी स्टर्लिंग देशांना सहकार्यानें विशेष तऱ्हेचे प्रयत्न आपलें स्थान मजबूत करण्यासाठीं करावे लागणार आहेत. अमेरिकेकडून मागासलेल्या राष्ट्रांना मिळणाऱ्या मदतीच्या प्रमाणावर आग्नेय आशियांतील देशांची स्थिति कांहींशी अवलंबून राहील. हल्लींच्या काळांत मंदीची लाट निर्माण झाली तर तिला रोखून धरण्यासाठी सरकारला निरनिराळे उपाय त्वरित योजतां येतात व त्यामुळें आर्थिक परिस्थिति कांहीं प्रमाणांत आटोक्यांत राहूं शकते. गेल्या २० वर्षांत आर्थिक विचारसरणीच्या बाबतींत झालेल्या प्रगतीमुळें यापुढें मंदीचे दुष्परिणाम फार मोठ्या प्रमाणांत जीणवणार नाहींत, ही एक गोष्ट आज आपणाला अनकूल आहे. याच्याच जोडीला दुसरी अनुकूल गोष्ट म्हणजे उत्पादनक्षमता वाढविणारा पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम, आज दुरुस्त अंदाजाप्रमाणें देशासमोर आहे. पंचवार्षिक योजनेचा उद्देश राहाणीचें मान, वाढविणें हा आहे. यामुळें जनतेची क्रयशक्ति वाढावयास मदत होणार आहे. निर्गतीसाठी जादा प्रमाणांत विक्रीमाल अशी स्थिति यापुढें कांहीं वर्षे तरी हिंदमध्यें उद्भवणार नाहीं असें वाटतें. पंचवार्षिक योजनेसाठी भांडवलाला मागणी असल्यामुळें व्याजाचे दर समाधानकारकच ठेवले जातील. कारखानदारांना उत्पादनाची किंमत कमी कमी राखतां येईल या गोष्टीवर भर द्यावा लागणार आहे. हिंदचा आधारभूत धंदा जो शेती, त्याची परिस्थिति सुधारण्याचे प्रयत्न पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमामुळें केले जात आहेत व त्यामुळें शेतकरी वर्गाची क्रयशक्ति सुधारण्याला मदत होईल. सरकारचें धोरणहि अगदीं जागरूक बनलें आहे हें १९५३ च्या पहिल्या सहामाहिसाठीं आयातीच्या बाबतींत जाहीर करण्यांत आलेल्या धोरणावरून स्पष्ट होत आहे. रिझर्व्ह बँकेचें पैशाची मदत करण्याचें धोरण चहा व शेती याबाबतींत स्पष्ट झालेंच आहे. करांचा बोजाहि वाढत जाणार व अंदाजपत्रकांची तोंडमिळवणी करणें जास्त कठिण जाईल. आंतरराष्ट्रीय परिस्थिति कशीहि असली तरी हिंदसमोर आज सर्वांगीण विकास-योजनेचा मर्यादित कार्यक्रम तयार असून त्याची अंमलबजावणी करणें बऱ्याचशा बाबतींत हिंदच्या हातीं आहे. आजच्या संमिश्र अर्थव्यवस्थेंत खाजगी भांडवलदार, परकी भांडवलदार, शेतावर काम करणारे लोक व कारखान्यांत काम करणारे मजूर या सर्वांच्या बाबतींत सरकारचें धोरण सहानुभूतीचें आहे. १९३० च्या मानानें आज आपली साधनसामुग्री वाढलेली आहे एवढेंच नव्हे, तर तिचा विचारपूर्वक उपयोग आपलें सरकार करीत आहे. यामुळें १९५३ हें वर्ष आर्थिक दृष्ट्या प्रगतीचीं बीजें निर्माण करणारें कदाचित ठरेल; निदान तें जास्त त्रासाचें जाणार नाहीं अशी अपेक्षा आहे.


---

**गढवालमध्यें तांब्याच्या खाणी**—गढवाल (उत्तर-प्रदेश) भागांत तांब्याच्या खाणी निघण्याची शक्यता असल्याचा अहवाल भूगर्भशास्त्रज्ञांनी भारतीय सरकारकडे पाठविला आहे. तांब्याशिवाय शिसें आणि चांदी ह्यांच्याहि खाणी सांपडण्याचा संभव असल्याचें समजतें. भारतीय सरकारनें आपले तीन तज्ज्ञ गढवालमध्ये तपासणी करण्यासाठी पाठविले आहेत.

**नागपूरचा नवा ट्रॅन्समिटर**—नागपूर रेडिओसाठी कामटी रोडवर उभारण्यांत येणारा १० किलोवॅट शक्तीचा नवा ट्रॅन्समिटर मार्चपर्यंत तयार होईल असें समजतें. ध्वनिलहरी प्रक्षेपित करणारी कांठी ३५० फूट उंचीची होईल आणि ती सर्व दिशांना एकाच गतीनें ध्वनि प्रक्षेपित करील.

**ब्रह्मदेशाला भारतीय एंजिनिअर**—भारतीय एंजिनिअर्सना ब्रह्मदेशांत नोकरीवर घेण्यासाठीं सवलती देण्यांत याव्या, अशी विनंती ब्रह्मी सरकारनें केली आहे. ब्रह्मी सरकार एक प्रतिनिधि-मंडळ लौकरच दिल्ली, मुंबई व मद्रास शहरांना ह्या कामासाठी भेट देणार आहे. ब्रह्मदेशाच्या पुनर्घटनेसाठी एंजिनिअर्सची फार आवश्यकता आहे.

## नेतृत्व—आपली प्राचीन परंपरा



प्राचीन काळीं भारतास प्राप्त झालेल्या वैभवाचें श्रेय बऱ्हंशीं भारतीय कारागिरांचे कसब व संशोधन, भारतीय नाविकांचें धाडस व नैपुण्य, भारतीय गणितशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ यांची प्रगाढ विद्वत्ता यांनाच द्यावें लागेल. संस्कृत वाङ्मय व विज्ञान यांत खरोखरच महान संस्कृतींचे महत्त्वाचे मूलभूत सिद्धांत संग्रहीत केलेले आहेत.

अशा या सपन्न व तेजस्वी भारतीय संस्कृतीचा प्रभाव आसपासच्या देशांवर पडणें हें अगदी स्वाभाविक होतें. भारतीय तत्त्वज्ञान, विज्ञान व विविध कला यां सर्वांची आतां पुन्हा नव्या पायावर उभारणी होऊन त्यांचा अधिकच विकास झालेला आहे; आणि 'बोरो बुदुर', 'प्रवनम' व 'ओंगोरथाम' यां सारखीं भव्य स्मारकें भारतीय शिल्पशास्त्रज्ञ व कारागीर यांच्या प्रचंड उत्साहाची व प्रखर बुद्धिमत्तेची ग्वाही देतात.

आतां पुन्हा भारतीय विज्ञान व संस्कृतीचा भारताबाहेर प्रसार
होऊं लागला असून इतर राष्ट्रांवर त्यांचा स्पष्ट व अचूक प्रभाव पडत आहे.
औद्योगिक दृष्टया अजस्त्र अशा योजना जगाचे लक्ष वेधीत आहेत व त्यांबद्दल
जगभर भारताची मुक्तकंठानें प्रशंसा होत आहे.

भारतीय पुनरुत्थापनाच्या या कार्यांत टाटा स्टील अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावतें.

**दि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड**

TN.3015

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गांविवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.